महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण


९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र.२६/प्रनिप्रा/१९३ दिनांक : 17 JUN 2020

## बैठकीचे इतिवृत्त

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राजय तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, **दिनांक ०९ जुन, २०२० रोजी सकाळी १२:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या १६ व्या बैठकीचे (Video Conference) इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्यांनी सहभाग घेतला होता ,-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | **डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु,**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे रायगड | .... | सदस्य |
| २) | **प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर,**<br>सदस्य तथा कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | .... | सदस्य |
| ३) | **डॉ.के.डी.चव्हाण,**<br>कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | | |
| ४) | **डॉ. अभय वाघ,**<br>संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य | .... | सदस्य |
| ५) | **डॉ.विश्वजित माने,**<br>सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषी विषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | .... | सचिव |
| ६) | **श्री.संदीप कदम (भा.प्र.से),**<br>सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य. | | |

१) डॉ. धनराज माने, सदस्य तथा संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व २) श्री. विश्वजीत माने, (भा.प्र.से.) सदस्य तथा सदस्य सचिव व महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे सदस्य बैठकीस सहभागी झाले नव्हते.

२) प्राधिकरणाच्या उक्त बैठकीत बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या **दिनांक ०९ जुन, २०२०** रोजीच्या वैठकीचे विषयनिहाय इतिवृत्त खालील प्रमाणे आहे,-

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| १. | दिनांक १९ मार्च, २०२० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या वैठकांचे इतिवृत्त सादर करणे. | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.१९ मार्च, २०२० रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृतांची नोंद घेण्यात आली. |
| २. | यापुर्वी दिनांक १९ मार्च, २०२० व त्यापुर्वी झालेल्या बैठकांमधील निर्णयावरील प्रलंबित मुद्दयांवरील कार्यवाहीचा अहवाल वैठकीपुढे ठेवणे. | राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ज्या ठेवी राष्ट्रीकृत बॅकेव्यतिरीक्त इतर वॅकेमध्ये गुंतवल्या आहेत अशा सर्व प्रकारच्या ठेवी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यायसायिक शैक्षणिक (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या तरतुदीनुसार राष्ट्रीकृत बॅकेमध्ये गुंतविण्यात याव्यात. असा निर्णय प्राधिकरणाने घेतला होता. त्यानुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने एक्सिस बॅकेत गुंतविलेल्या मुदतठेवी काढुन घेतल्या असुन त्यांची स्टेट बॅकेमध्ये गुंतवणुक करण्यात येत आहे. तशीच कार्यवाही एच.डी. एफ.सी बॅकेमध्ये गुंतविलेल्या ठेवीच्या संदर्भात करण्यासाठी सीईटी सेल ने एच.डी.एफ.सी. बॅकेला दि.१६ मार्च, २०२० रोजी कळविले असुन त्यानंतर तातडीने सदर मुदतठेवी मुदतपूर्व मोडित काढुन त्यांचे प्रदान करण्याबाबत एच.डी.एफ.सी बॅकेला आतापर्यंत पाच वेळा कळविण्यात आले आहे व याबाबत कार्यालयाकडुन पाठपुरावा सुरु आहे.<br>परंतु सदर ठेवी Non-Withdrawable म्हणुन गुंतवण्यात आल्यामुळे बॅकेकडुन सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. परंतु कार्यालयाकडुन याबाबत पुर्ण प्रयत्न चालु आहेत.<br>वरील खुलाशानंतर प्राधिकरणाकडुन असे निर्देश देण्यात येत आहे की, प्राधिकरणाच्या निर्णयानुसार व निदेशाप्रमाणे या बॅकेतील मुदतठेवी मोडीत काढुन त्या रकमेची गुंतवणुक राष्ट्रीकृत बॅकेमध्ये तात्काळ करावी.<br>अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करुन राष्ट्रीकृत बॅकेव्यतिरीक्त अन्य बॅकेमध्ये ठेवीची गुंतवणुक करणे हे अयोग्य असल्यामुळे संबधित अधिकाऱ्याकडुन याबाबतचा खुलासा तात्काळ घेण्यात यावा व त्यांच्या विरुध्द कार्यवाही करावी. |
| ३. | दि.१९ मार्च, २०२० रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेसाठी निवडण्यात आलेल्या सार पोर्टल संदर्भातील प्रकरणाची वस्तुस्थिती पडताळण्यासाठी प्राधिकरणांतर्गत प्राधिकरणाचे सदस्य डॉ.गायकर, माजी कुलगुरु, डॉ.बाबासाहेब | शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेसाठी निवडण्यात आलेल्या सार पोर्टल संदर्भातील प्रकरणाची वस्तुस्थिती पडताळण्यासाठी प्राधिकरणांतर्गत डॉ.गायकर, माजी कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल प्राधिकरणापुढे सादर केला. या चौकशीमध्ये समितीला निर्देशनास आलेल्या बाबी व निष्कर्ष यांची सविस्तर माहिती डॉ.गायकर यांनी |



17/6/20

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अहवाल प्राधिकरणापुढे सादर करणे. | बैठकीत विशद केली. सदर प्रकरणाच्या चौकशीमधील निष्कर्षानुसार डॉ.गायकर यांच्या समितीने पुढीलप्रमाणे वैशिष्टपुर्ण (Salient Feature) मुद्दयांवर शिफारसी केल्या.<br>१. सीईटी सेलने, शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान जून, २०१९ मध्ये उद्भवलेल्या परिस्थितीत सार पोर्टलशी व कॅप पोर्टलशी संबंधित मे.केटीपीएल आणि मे.एफपीटीएल या दोन एजन्सींच्या पोर्टलमध्ये सुसंगतता होती किंवा नाही आणि त्या दरम्यान प्रवेश प्रक्रियेच्या कामात बाधा निर्माण होण्याची परिस्थिती का उद्भवली याची पडताळणी करण्यासाठी प्राधिकरणाने तातडीने आय.टी, अभियांत्रिकी व उदयोग क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची कमिटी स्थापन करावी.<br>२. सदर प्रकरणी, प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम अंमलबजावणी करताना तांत्रिक बाबीप्रमाणेच प्रशासकीय स्तरावर देखील उणीवा राहिल्या असल्याचे तसेच समन्वयाचा अभाव दिसुन येत असल्यामुळे भविष्यात अशा प्रकारच्या घटना/प्रसंग उद्भवु नयेत यासाठी परिणामकारक उपाययोजना सुचविण्याकरिता सदर प्रकरणी सचिव दर्जाच्या सेवानिवृत्त भा.प्र.से. अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.<br>३ (अ) - शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेसाठी नियुक्त केलेल्या एजन्सीपैकी M/S.Four Pillers Pvt Ltd & M/S. Synthesis Sloution Pvt Ltd यांना स्वतंत्र व वेगवेगळया MOU द्वारे सुपूर्त केलेले काम त्या एजन्सीने समाधानकारकरित्या पुर्ण केले असल्याची खात्री करुन आणि विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यांच्या कामाची देयके अदा करण्यात यावी. तसे करताना एजन्सीने दिलेल्या बॅक गॅरंटीची वैधता तपासावी.<br>३ (ब) - M/S.Kalp Technology Pvt Ltd या एजन्सीला सन २०१९-२० या वर्षाच्या दुसऱ्या टप्प्यावर वेगळया व स्वतंत्र MOU द्वारे प्रवेश प्रक्रियेशी संबंधित विधी, कृषी व सफलता पोर्टलचे काम सुपूर्त करण्यात आले होते ते त्यांनी पूर्ण केले आहे. सदर कामाची देयके, त्यांनी केलेले काम समाधानकारक पूर्ण केल्याचे खात्री करुन तसेच विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन अदा करण्यात यावी. तसे करताना एजन्सीने दिलेल्या बॅक गॅरंटीची वैधता तपासावी.<br>तथापि वरीलप्रमाणे सदर एजन्सीने पुर्ण केलेल्या कामाचे पेमेंट करताना सदर एजन्सीने SAAR Portal च्या संदर्भात विद्यार्थ्यांकडुन जमा केलेला नोंदणी फी ची रक्कम वसुली योग्य असल्यास तेवढी रक्कम या संदर्भातील आवश्यक ती तत्वांचे पालन करुन वसुल करावी. |



12/1/20

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | | त्याचप्रमाणे सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीचा भाग म्हणुन करण्यात आलेल्या वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीशी संबंधित अथवा इतर कामाबाबतची देयके प्रलंबित असल्यास ती विहित कार्यपध्दतीनुसार अदा करावी.<br>प्रवेश प्रक्रियेचे काम केलेल्या एजन्सींची देयके प्रदान करण्याच्या संदर्भात डॉ.म्हैसेकर यांनी आपले मतवजा सुचना केली की, या प्रकरणाची तांत्रिक तपासणी करण्यासाठी समिती गठीत करण्यात येणार असल्यामुळे सर्व एजन्सीला देयकाच्या ८० टक्के इतकी रक्कम अदा करावी व उर्वरित २० टक्के रकमेवर तांत्रिक समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यवाहीसाठी तो अहवाल पुढील कार्यवाहीसाठी प्राधिकरणास तात्काळ सादर करण्यात यावा.<br>समितीने प्रवेश प्रक्रियेशी संबंधित वर नमुद एजन्सीने दिलेल्या बँक गॅरंटीची वैधता तपासण्याबाबत सुचित केले आहे. तथापि अशा प्रकारची बँक गॅरंटी कोणत्याही एजन्सीकडुन घेण्यात आली नसल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते. त्यामुळे बँक गॅरंटी ऐवजी एजन्सीकडुन Indemnity Bond घेण्यात यावा अशा प्रकारच्या सुचना करण्यात आल्या.<br>समितीचा अहवाल सुचनांसह स्विकारण्यात येत आहे. त्यानुसार यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात यावी. |
| ४. | २०२०-२१ वर्षासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने अभ्यासक्रमनिहाय निश्चित केलेल्या प्रवेश प्रक्रिये कार्यक्रमामध्ये कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या परिणामी वेळोवेळी करण्यात आलेला बदल, अंतिम: निश्चित केलेल्या तारखा याबाबतची माहिती प्राधिकरणास अवगत करणे तसेच कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या कठीण परिस्थितीत प्रवेश प्रक्रिया राबविण्यामध्ये येत असलेले अडथळे आणि त्यामुळे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षापुढे निर्माण झालेले विविध प्रश्न/आव्हाने याबाबत प्राधिकरणास अवगत करणे. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने अभ्यासक्रमनिहाय निश्चित केलेला प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम आणि कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या परिणामी उद्‌भवलेल्या परिस्थितीत विद्यार्थ्यांची अडचण व गैरसोय विचारात घेऊन सीईटी सेल ने या कार्यक्रमामध्ये वेळोवेळी करण्यात आलेला बदल आणि सद्यस्थितीत अंतिमत: निश्चित केलेला प्रवेश परीक्षेचा कार्यक्रम याबाबतचा सविस्तर तपशिल मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी बैठकीपुढे मांडला आणि सदर प्रवेश परीक्षा कार्यक्रम निरविघ्नपणे पार पाडण्यासाठी वेळोवेळी केलेली मांडणी व उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती दिली. (२०२०-२१ या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेचा अंतिमत: निश्चित केलेला कार्यक्रम आणि या परीक्षा पार पाडण्यासाठी सीईटी सेलने केलेल्या उपाय योजना याबाबतची टिपणी जोडपत्र - अ व ब आहे.)<br>त्याचप्रमाणे कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या परिणामी प्रवेश परीक्षा कार्यक्रम पार पाडण्यासाठी कोणत्या स्टेप घेतल्या आहेत तसेच परीक्षा कार्यक्रम |



17/6/20

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
| --- | --- | --- |
| | | राबविण्यासाठी भविष्यात उद्‌भवणाऱ्या कठीण परिस्थितीत कोणकोणते अडथळे उद्‌भवणार आहेत आणि परिणामस्वरुप सीईटी सेलपुढे कशा प्रकारची आव्हाने उभी राहतील याबाबतची माहिती देखील प्राधिकरणास अवगत केली व या संदर्भात, कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या परिस्थितीत परीक्षा केंद्राच्या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी वैदयकीय सुविधा व त्यांच्या राहण्याची आवश्यक ती व्यवस्था याबाबत उपाययोजना करणे गरजेचे असल्याने मा.सदस्यांनी आपले मत/सुचना कराव्यात अशी मा.अध्यक्ष यांच्या वतीने विनंती केली.<br>२. प्राधिकरणाच्या बैठकीत सादर केलेल्या प्रवेश प्रक्रिया कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्राधिकरणाचे मा.सदस्य तथा संचालक, तंत्रशिक्षण यांनी असे निदर्शनास आणले की, AICTE च्या गाईड लाईनप्रमाणे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाचे अभ्यासक्रम सुरु करता येणे शक्य होणार नाही त्यामुळे या संदर्भात त्यांच्याकडुन मुदतवाढ घेण्यात यावी असे त्यांनी सुचित केले. यावर मा.आयुक्त, तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी असे स्पष्ट केले की, या संदर्भात सीईटी सेलने यापूर्वीच AICTE कडे पत्रव्यवहार केला आहे व याबाबत पाठपुरावा करण्यात येईल असे नमुद केले.<br>३. कोविड-१९ च्या कालावधीत करावयाच्या अनुज्ञेय बाबींमध्ये (Permissible activity) परीक्षा हा विषय नसेल तर शासनाची याबाबत परवानगी घेण्यात यावी.<br>कोविड-१९ चा प्रादुर्भाव व Containment Zone विचारात घेऊन आवश्यक त्या सर्व उपाययोजना करता येतील. तद्‌वत परीक्षा चालु असताना मा.सदस्यांनी शक्य असल्यास परीक्षा केंद्रांना भेटी देऊन आवश्यक त्या सुचना व मार्गदर्शन करावे असे सुचित केले.<br>४. मा.संचालक, तंत्रशिक्षण यांनी, सद्यास्थितीत पावसाळा ऋतु सुरु असल्यामुळे कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढल्यास यावर्षातील प्रवेश प्रक्रिया प्रक्रिया कार्यक्रम पुढे ढकलण्याची परिस्थिती उद्‌भवु शकते. त्यामुळे तसे झाल्यास प्रवेश परीक्षेचा पर्यायी कार्यक्रम (Backup Plan) आपण आधीच तयार करुन ठेवणे आवश्यक वाटते असे प्रतिपादन केले.<br>५. उपरोक्त सुचना प्राप्त परिस्थितीत अत्यंत उपयुक्त असल्याने सर्व सदस्यांनी या सुचनेस अनुमोदन दिले आणि त्या दृष्टीने सीईटी सेलने आवश्यक ती कार्यवाही करुन उपाययोजना करावी असे सुचित केले.<br>६. पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी २० टक्के विद्यार्थी हे केंद्राबाहेरील (बहिस्त) असणार आहेत. त्यामुळे कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या परिणामी विद्यार्थ्यांची सुरक्षितता व |



12/6/20

| विषय क्रमांक | विषय | कार्यवाही |
|---|---|---|
| | | आरोग्य हित विचारात घेऊन सदर विद्यार्थ्यांची व्यवस्था करणे आवश्यक असल्याने तशा प्रकारची व्यवस्था आणि इतर आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत सीईटी सेलने निर्णय घेण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.<br>त्याचप्रमाणे या संदर्भात गरजेनुसार मदत मिळण्यासाठी शासनाकडे पत्र व्यवहार करण्यात यावा असाही निर्णय घेण्यात आला.<br>७. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश परीक्षांचा निकाल कधी घोषित केला जाईल याबाबतचा कार्यक्रम सीईटी सेलने निश्चित करावा असेही सुचित करण्यात आले.<br>८. फाईन आर्ट या अभ्यासक्रमाच्या परिक्षेसंदर्भात संचालक, कला संचालनालयाकडुन ऑफलाईन परिक्षा घेण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला असल्याचे मा.सचिव यांनी निदर्शनास आणुन याबाबत प्राधिकरणाने निर्णय घ्यावा असे प्रस्तावित केले. सदर प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली. तथापि सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मंत्रालय, मुंबई यांची सहमती घेण्यात यावी असे निर्देशित केले. |

वरीलप्रमाणे विषयनिहाय चर्चा झाल्यानंतर कामकाज पुर्ण झाल्यानंतर प्रवेश प्रक्रिया कार्यक्रमाच्या संदर्भात आपली मते सदस्यांनी मांडावी, असे मा.अध्यक्ष, यांनी सुचित केले असता प्राधिकरणाच्या सर्व मान्यवर सदस्यांनी कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या लॉक डाऊन कठीण परिस्थितीत, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचा कार्यक्रम राबविण्यासाठी परिस्थितीनुसार केलेली कार्यवाही प्रशंसनिय व कौतुकास्पद असल्याचे नमुद करुन सीईटी सेलला धन्यवाद दिले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 17/6/20